# नियमित दावा क्रमांक १९/२०१७ मधील
# निशाणी क्रमांक ५ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज वादीनी दिवाणी प्रक्रिया सहिंतेच्या आदेश ३९ नियम १ व २ आणि कलम १५१ अंतर्गत तुर्तातुर्त मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की जिल्हा सांगली तालुका कवठेमहांकाळ पैकी मौजे कोंगनोळी या ग्रामपंचायत हद्दीतील वडिलार्जित शेत मिळकती व घर मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे -

अ) <u>शेत मिळकती</u> -

| अ.क्र. | गट नंबर | क्षेत्रफळ<br>हेक्टर आर | आकार<br>रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | १०१ | ००-२२ | ००.१७ |
| २ | १६८ | ००-०० | ००.०१ |
| ३ | १९२ | ००.०१ | ००.०३ |
| ४ | १९८ | ००.५९ | ००.५७ |
| ५ | ९७ | ०१.३८ | ०२.७८ |
| ६ | १९३ | ००.४३ | ००.९४ |

ब. <u>घर मिळकती</u> -

१. मालमत्ता क्रमांक ५६० - मातीचे घर – ४६.४५ चौरस फुट

२. मालमत्ता क्रमांक १७३ - अर्धपक्के घर – १३.९४ चौरस फुट

३. मालमत्ता क्रमांक १७८ - पडसर/खुली जागा - १८.५८ चौरस फुट.

क. नगर भुमापन क्रमांक ५१३ एकुण क्षेत्रफळ ६०.०६ चौरस मिटर यामधील १/४ हिश्याची मिळकत.

ड. नगर भुमापन क्रमांक ५१४ एकुण क्षेत्रफळ ८१.०६ चौरस मिटर यामधील १/४ हिश्याची मिळकत.

३. वर नमुद मिळकती या वादी यांच्या वडिलार्जित मिळकती असुन सर्व मिळकती या भोगवटादार म्हणुन नावे नमुद झालेल्या आहेत. वादीचे वडील गुलाब अहमद नदाफ यांच्या मृत्यु दिनांक २१.११.२०११ रोजी झाला असुन आई जन्नतबी यांचा मृत्यु दिनांक ११.१०.२००४ रोजी झालेला आहे. वादी व प्रतिवादी नंबर १ ते ७ हे गुलाब नदाफ यांचे कायदेशिर वारस आहेत.

४. वादी हे पहिल्यापासुन गावी येवुन-जावुन वाद मिळकतीमध्ये आपली वहिवाट करत होते. वादी-प्रतिवादी हे गुलाब नदाफ यांचे कायदेशिर वारस असुन त्यांची नावे मिळकत सदरी लागलेली आहेत. वादी व प्रतिवादी हे आजअखेर वाद मिळकतीचे उत्पन्न घेत असुन घर मिळकतीचा उपभोग घेत आहेत. प्रतिवादी नंबर १ हे कोंगनोळी गावी कायम वास्तव्यास असल्यामुळे वादी व इतर प्रतिवादी यांनी वाद मिळकतीत संरक्षण व कसणेची जबाबदारी प्रतिवादी नंबर १ यांना देण्यात आली होती. वादी व इतर प्रतिवादी हे वाद मिळकतीबाबतचा होणारा खर्च वेळोवेळी एकत्रीत येवुन प्रतिवादी नंबर १ यास देत होते. प्रतिवादी नंबर १ हे वाद मिळकतीमधील उत्पन्न वादी व इतर प्रतिवादी

यांना प्रतिवर्षी ज्याच्या-त्याच्या हिश्याचे देत होते.

५. वादीचे पुढे असे कथन आहे की सन २०१५ पासुन प्रतिवादी नंबर १ यांनी वाद मिळकतीमधील कोणतेही उत्पन्न वादी यांना दिलेले नाही. याबाबत विचारणा केली असता प्रतिवादी नंबर १ यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व वादीचे उत्पन्न हडप केले. वादीने इतर प्रतिवादी यांना उत्पन्न दिले का याबाबत विचारणा केली असता त्यांनाही प्रतिवादी नंबर १ ने उत्पन्न दिले नसल्याचे समजले. सन २०१५ मध्ये वाद मिळकतीमध्ये कोणतेही नुकसान झालेले नसुन प्रतिवादी नंबर १ वाद मिळकतीमधील उत्पन्न आपल्याकडेच ठेवल्याचे मार्च २०१६ मध्ये वादीस समजले. त्यावेळी वादीनी त्याबाबत विचारणा केली असता प्रतिवादी नंबर १ ने वाद मिळकत माझी आहे, तुमचा काही संबंध नाही व मी शेत मिळकतीमधील उत्पन्न कोणास देणार नाही, तुम्हास काय करायचे ते करा अशी धमकावणी दिली. त्याबाबत वादी यांनी इतर प्रतिवादींशी मे-२०१६ मध्ये बैठक घेतली. सन २०१५ पासुन प्रतिवादी नंबर १ ने वाद मिळकतीमधील उत्पन्न वादी व इतर प्रतिवादी यांना देण्याचे टाळल्यामुळे व वाद मिळकतीपासुन त्यांना अटकाव केल्यामुळे वादीने सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी नंबर १ यांनी दाव्याचा अंतिम निकाल होईपावेतो कोणत्याही व कसल्याही प्रकारे दावा मिळकतींची तबदिली करु नये अशा आषयाचा तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळावा यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

६. प्रतिवादी नंबर १ यांनी प्रस्तुतच्या दाव्यात उपस्थित होवुन नि.क्र.४२ वर कैफियत व म्हणणे सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी वादीचे सर्व कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी नंबर १ ने असे कथन केले आहे की दिनांक ३०.१०.२००९ रोजी दावा मिळकतींचा हिब्बानामा हा ज्ञानु बापु बेडगे व

दिलावर बंडु नदाफ यांच्यासमक्ष केला असुन हिब्बानामेने दावा शेत मिळकती व घर मिळकती प्रतिवादी नंबर १ यांना मिळालेल्या आहेत. तेंव्हापासुन सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी नंबर १ यांचीच हिब्बानामेने कब्जा व वहिवाट आहे. प्रतिवादी नंबर १ चे पुढे असे कथन आहे की मुस्लीम कायद्यानुसार गुलाब यांनी प्रतिवादी नंबर १ यास दिनांक ३०.१०.२००९ रोजीच्या हिब्बानामेने मिळकत दिली असल्याने कायद्यानुसार दावा मिळकतींचे वाटप करता येणार नाही. वादीचा दावा कायद्यानुसार चालण्यास पात्र नाही. वादी यांना दावा मिळकतीमध्ये कोणताही हिस्सा येत नाही. हिब्बानामेने प्रतिवादी नंबर १ यास दावा मिळकती आल्याने वाद मिळकतीमध्ये वादीचा कोणताही कसलाही हक्क हितसंबंध नाही, असे नमुद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती केलेली आहे.

७. प्रतिवादी नंबर ३अ, ३ब व ३क यांनी निशाणी २२ वर, प्रतिवादी नंबर ४ यांनी निशाणी २३ वर, प्रतिवादी नंबर ५/१ व ५/२ यांनी निशाणी २४ वर व प्रतिवादी नंबर २, ६ व ७ यांनी निशाणी ३६ वर आपली कैफियत मांडुन वादीचा दावा मान्य केलेला आहे.

८. वरील दोन्ही वाद कथने लक्षात घेता प्रस्तुत अर्जासाठी खालील मुद्दे विचारासाठी निघतात. त्याचे विवेचन मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| १. वादीने सकृतदर्शनी केस त्याच्या पक्षात असल्याचे शाबीत केले आहे काय ? | ...होय. |
| २. दाव्याचा समतोल वादीच्या पक्षात असल्याचे वादी शाबीत करतो काय ? | ...होय. |

३.    तुर्तातुर्त मनाई हुकुम न दिल्यास वादीचे अपरिमित
      नुकसान होणार असल्याचे वादी सिध्द करतो काय?   ...होय.

४.    काय आदेश?   ...अर्ज मंजुर करण्यात येतो.

कारणमिमांसा.

९.        वादी यांनी दावा शेत व घर मिळकतीचे सातबारा उतारे व ८अ उतारे (नि.क्र.३/१ ते ३/१२) वर दाखल केलेले आहेत. प्रतिवादी नंबर १ ने दिनांक ३०.१०.२००९ रोजीचा हिब्बानामा फेरिस्त निशाणी ४५ सोबत दाखल केलेला आहे.

मुद्दा क्रमांक १ ते ३ बाबत -

१०.        मुद्दे क्रमांक १ ते ३ हे ऐकमेकांशी संलग्न असल्याने मी त्यांचे विवेचन एकत्र देत आहे.

११.        प्रस्तुतचा दावा वादीने वाटप, कब्जा व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी दाव्यामध्ये त्यांची वंशावळ दिलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता गुलाब महंमद नदाफ यांचा मुलगा असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे प्रतिवादी नंबर १ ते ७ हे देखिल गुलाब नदाफ यांचे मुले व मुली असल्याचे दिसुन येते. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी नंबर १ विरुध्द मनाई आदेश मागितला असल्याचे दिसुन येते. त्या अनुषंगाने प्रतिवादी नंबर १ च्या जबाबाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. प्रतिवादी नंबर १ यांनी निशाणी ४२ वर दाव्याची कैफियत व अर्जाचे म्हणणे सादर केले आहे. त्यामध्ये खरी वस्तुस्थिती नमुद करतांना गुलाब अहमद नदाफ हे दिनांक २१.११.२०११ रोजी मयत झाल्याचे

नमुद केलेले आहे. मयत होण्यापुर्वी गुलाब नदाफ यांनी दिनांक ३०.१०.२००९ रोजी दावा कलम १ मधील नमुद मिळकती या हिब्बानामेने प्रतिवादी नंबर १ यांना दिल्याचे कथन केलेले आहे. मृत्युसमयी गुलाब नदाफ यांच्याकडे कोणतीही मिळकत नसल्याचे नमुद करुन हिब्बानामा झालेला असल्याने कायद्यानुसार वाटप करता येणार नाही, असे नमुद केले आहे.

१२. वादीनी निशाणी ३ सोबत दावा मिळकतींचे खाते उतारे, सातबारा उतारे , ८अ चा उतारा व सिटी सर्वे उतारा दाखल केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये गुलाब महंमद पिंजारी उर्फ नदाफ यांच्या वारसांची नावे नमुद झाल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. यामध्ये वादीचे देखिल नाव असल्याचे अवलोकित होते. सदरचे उतारे हे सर्व साधारणपणे सन २०१६ मध्ये काढले असल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे नगर भुमापन क्रमांक ५१३ व ५१४ या मिळकतीवर गुलाब नदाफ यांचेच नाव अस्तीत्वात असल्याचे दिसुन येते. प्रतिवादीच्या म्हणण्याप्रमाणे दिनांक ३०.१०.२००९ रोजी हिब्बानामा झाला असल्यास त्या अनुषंगाने मिळकतीवर फक्त प्रतिवादी नंबर १ चे नावे नमुद असणे सकृतदर्शनी अपेक्षित होते. परंतु त्याबाबतचे कोणतेही स्पष्टीकरण प्रतिवादी नंबर १ ने दिलेले नाही. त्याचप्रमाणे त्याने दिनांक ३०.१०.२००९ रोजीचा तथाकथीत हिब्बानामेची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. सदर हिब्बानामा अनोंदणीकृत असल्याचा दिसुन येतो. त्यामुळे हिब्बानामा झाला आहे, ही बाब पुराव्याने शाबीत होणे आवश्यक आहे. प्रस्तुत हिब्बानामेच्या आधारे प्रतिवादी नंबर १ दावा मिळकतीच्या अनुषंगाने तृतियपक्ष हक्क-हितसंबंध निर्माण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. महसुल नोंदी पाहता त्यावर वादी व प्रतिवादी नंबर १ ते ७ यांची नावे दिसुन येतात. त्याचप्रमाणे भुमापन क्रमांक

५१३ व ५१४ यावर गुलाब नदाफ यांचेच नाव असल्याचे दिसुन येते. यावरुन वादीचा हक्क हिस्सा असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. यामुळे दाव्याचा समतोल व सकृतदर्शनी केस वादीच्या पक्षात राहते.

१३. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये दावा प्रलंबित असतांना दावा मिळकतींच्या अनुषंगाने तृतियपक्षिय हक्क हितसंबंध निर्माण झाल्यास वादीचे पुर्ण नुकसान होणार आहे . वरील सर्व बाबी विचारात घेवुन मी मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे उत्तर होकारार्थी देत आहे व मुद्दा क्रमांक ४ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नंबर १ यांनी दावा कलम १ मधील नमुद मिळकतीबाबत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणत्याही प्रकारे अथवा कोणाही मार्फत तृतियपक्षीय हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत.

३. खर्चाचा विचार मुळ दाव्याच्या कामी करण्यात यावा.

sd/...

दिनांक ०४.०७.२०१९. (श्रीनिवास अ.कुलकर्णी )

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

कवठेमहांकाळ. कवठेमहांकाळ.